संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक माणदेशी बुलंद आवाज..

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे

मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com




वर्ष : ६ वे ● ● अंक : १०५ ● ● शनिवार दि. ०२ मार्च २०२४ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021

## सर्व पक्षांना संपवून भाजपाला एकट्यालाच जीवंत राहायचंय? शिंदे गटाचा संतप्त सवाल

**मुंबई:माणेदश एक्सप्रेस**

लोकसभा निवडणूक अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. त्यामुळे देशभरातील विविध पक्ष निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत. युत्या आणि आघाड्यांमध्ये जागावाटपासाठी बैठका चालू आहेत. महाराष्ट्रात महायुतीत भारतीय जनता पार्टी, शिवसेनेचा शिंदे गट, राष्ट्रवादीचा अजित पवार गट आणि इतर लहान पक्ष आहेत. या पक्षांमध्ये सध्या वाटाघाटी चालू आहेत. तसेच लोकसभा निवडणुकीनंतर काहीच महिन्यात विधानसभा निवडणूकही होणार आहे. त्यामुळे विधानसभेबाबतही विचार चालू आहे. अशातच काही जागांवरून महायुतीत तणाव निर्माण झाल्याचं चित्र पाहायला मिळत आहेत.

शिवसेना पक्ष फुटून दोन गट पडले आहेत. त्यापैकी एक गट महायुतीत आहे. संयुक्त शिवसेनेच्या ५५ आमदारांपैकी ४० आमदार शिवसेनेच्या शिंदे गटात आहेत. तर १५ आमदार शिवसेनेच्या ठाकरे गटात आहेत. तसेच संयुक्त शिवसेनेच्या १८ खासदारांपैकी १३ खासदार शिंदे गटात, तर ५ खासदार ठाकरे गटात आहेत. अशातच जे आमदार आणि खासदार ठाकरे गटात आहेत त्यांच्या जागा आपल्याला मिळाव्या यासाठी भाजपाकडून प्रयत्न चालू असल्याची चर्चा आहे. भाजपाला शिवसेनेसह राष्ट्रवादीच्या काही जागा हव्या आहेत. त्यासाठी महायुतीत वाटाघाटी चालू असल्याचं बोललं जात आहे. परंतु, यावर शिवसेनेच्या शिंदे गटाने तीव्र संताप व्यक्त केला आहे.



शिवसेनेच्या शिंदे गटातील नेते रामदास कदम यांनी जागावाटपावर भाष्य केलं आहे. रत्नागिरी मतदारसंघ मिळावा यासाठी भारतीय जनता पार्टी प्रयत्न करत आहे. यावर रामदास कदम म्हणाले, भाजपा रायगड आणि रत्नागिरीच्या जागेसाठी अग्रही आहे म्हणे तुम्ही (भाजपा) रायगडमध्ये सांगाल आम्हीच उद्या म्हणाल रत्नागिरीतही आम्हीच त्यामुळे मला त्यांना सांगायचं आहे की, असं होत नसतं. रत्नागिरी ही आमची जागा आहे. तिथे आमचा उमेदवार निवडून आला आहे. त्या जागेवर पूर्णपणे शिवसेनेचा अधिकार आहे. तुम्ही रत्नागिरीची जागा मागाल, रायगडची जागा मागाल, तुम्हाला (भाजपाला) सर्व पक्षांना संपवून एकट्यालाच जीवंत राहायचं आहे का?

भाजपाविरोधात अधिक आक्रमक होत रामदास कदम म्हणाले, या सगळ्यावरून असा निष्कर्ष निघेल की, सर्वांना संपवून भाजपालाच जीवंत राहायचं आहे. परंतु, असं होणार नाही. आपण दोघे भाऊ-भाऊ, तुझं आहे ते वाटून खाऊ आणि माझ्याला हात नको लावू असं चालणार नाही. महायुतीत असं होता कामा नये. कुठल्याही परिस्थिती रत्नागिरीची जागा आम्ही सोडणार नाही. ती जागा आम्ही लढवणारच. ती आमच्या हक्काची जागा आहे. तिथे आमचा उमेदवार निवडून आला आहे.

रामदास कदम म्हणाले, रत्नागिरी-सिंधुदुर्गचे विद्यमान खासदार आमच्या पक्षाच्या तिकीटावर निवडून आले आहेत. विद्यमान खासदारांची निवडणुकीआधीची शेवटची सभा मी स्वतः घेतली होती. मी सावंतवाडीला जाऊन शिवसेना उमेदवारासाठी प्रचारसभा घेतली होती. आम्ही आमच्या हक्काची जागा का सोडावी? आमच्या या भूमिकेमुळे युतीत अजिबात फूट पडणार नाही. प्रत्येकाला वाटतं की, माझा पक्ष मोठा झाला पाहिजे. त्यामुळे असा विषय काढून प्रयत्न केला जातो. हळूच विचारून पाहू जमलं तर जमलं असा असा प्रकार केला जातो. याचा अर्थ माझं आहे ते माझंच आहे आणि तुझं आहे ते पण माझंच आहे. राजकारणात असं कधी होत नाही.

## संभाजी भिडेंना पोलीस संरक्षण देण्याची आमदार गाडगीळांची मागणी

**सांगली : माणदेश एक्सप्रेस**

शिवप्रतिष्ठानचे संस्थापक संभाजी भिडे गुरूजी यांच्यावर मनमाड येथे झालेल्या भ्याड हल्ल्याचा शिवप्रतिष्ठानकडून जाहीर निषेध करण्यात आला असून हा हल्ला पूर्व नियोजित होता असे पत्रक नगर प्रमुख अविनाश सावंत यांनी शुक्रवारी प्रसिद्धीस दिले आहे. तर भिडे गुरूजींना विशेष पोलीस सुरक्षा पुरवण्याची आमदार सुधीर गाडगीळ यांनी उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी केली आहे.



भिडे गुरूजी मनमाडचा कार्यक्रम आटोपून धुळ्याला निघाले असता काही समाजकंटकांनी गुरूवारी रात्री मोटार अडवून हल्ल्याचा प्रयत्न केला. हा प्रकार म्हणजे पूर्वनियोजित कट होता असा आरोप नगर प्रमुख सावंत यांनी आपल्या पत्रकात केला असून असे प्रकार संघटनेचे कार्यकर्ते कदापि खपवून घेणार नाहीत, यापुढे जशास तसे उत्तर देऊ असेही या पत्रकात म्हटले आहे.

दरम्यान, भिडे गुरूजी हिंदू जनजागृतीसाठी व छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज यांची महती सांगण्यासाठी दौरे करत असतात. त्यांच्यावर वेळोवेळी हल्ले करण्याचे प्रयत्न झाले आहेत. यामुळे त्यांना विशेष पोलीस संरक्षण देण्याची मागणी आमदार गाडगीळ यांनी एका निवेदनाद्वारे गृहमंत्री फडणवीस यांच्याकडे केली आहे.

## बेडकाने छाती फुगवली की त्याला वाटतं आपणं बैल आहोत, रुपाली चाकणकरांचा अमोल कोल्हेंना टोला

**मुंबई:माणदेश एक्सप्रेस**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार अमोल कोल्हे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसवर ही टीका केली की त्यांना शिरुरमध्ये उमेदवारही मिळत नाही. याबाबत रुपाली चाकणकर यांना विचारलं असता त्यांनी अमोल कोल्हेंना बेडकाची उपमा दिली आहे. रुपाली चाकणकर असंही म्हणाल्या आहेत की आधी अमोल कोल्हेंनी स्वतःच्या घरासमोरचा रस्ता नीट करावा.

बेडकाने छाती फुगवली त्याला वाटतं आपण बैल झालो



असं वाटतं. उमेदवार वगैरे मिळत नाहीत अशी हास्यास्पद विधानं त्यांनी करु नयेत. कारण इतके दिवस मतदारसंघात न फिरकलेले अमोल कोल्हे आता त्यांच्या नाटकाच्या निमित्ताने लोकांशी संपर्क करण्याचा प्रयत्न करत आहेत. स्वतःच्या घरासमोरचा रस्ताही त्यांना पाच वर्षात करता आला नाही. तरीही आपण मतदारसंघात आहोत असं सांगत आहेत. इतका आत्मविश्वास येतो कुठून हा प्रश्न आहेच.

सुनेत्रावहिनी या विकासाच्या जोरावर सगळ्या उमेदवारांमध्ये निवडून येतील असा आम्हाला विश्वास आहे. संधी मिळाली आहे त्यांना ही चांगलीच गोष्टच आहे. एकाच व्यक्तीला पंधरा वर्षे संधी मिळाली आता आदरणी सुनेत्रा वहिनीही चांगल्या मताधिक्याने निवडून येतील असं रुपाली चाकणकर यांनी म्हटलं आहे. तसंच अजित पवार हे लवकरच लोकसभेचे उमेदवार जाहीर करतील. प्रत्येक जागेवर अजित पवार उभे आहेत असं समजूनच मतदान होईल यासाठी आम्ही पूर्ण प्रयत्न करु.

अजित पवार यांनी अर्थसंकल्प सादर केला. त्यानंतर आम्ही महिला भगिनींनी अजित पवारांचे आभार मानले कारण त्यांनी विकासाच्या दृष्टीने हा अर्थसंकल्प सादर केला. तसंच महिला घटकांचा चांगला विचार केला आहे. आशा वर्कर यांच्या मागण्या मान्य केल्या आहेत. तसंच त्यांना न्याय देण्याची भूमिकाही आपण घेतली आहे असंही रुपाली चाकणकर म्हणाल्या.

## मराठा आरक्षणावर भुजबळ फडणवीसांची भाषा बोलतायत?

**मुंबई:माणदेश एक्सप्रेस**

महाराष्ट्रात गेल्या काही महिन्यांपासून मराठा आरक्षणाचा विषय तापला आहे. मराठा आरक्षणासाठी राज्यव्यापी आंदोलन उभारणारे मनोज जरांगे पाटील हे मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण द्यावं, अशी मागणी करत आहेत. तर राज्य सरकार मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण देण्यावर ठाम आहे. दरम्यान, मनोज जरांगे यांनी त्यांची मागणी लावून धरल्यानंतर राज्य सरकारने कुणबी नोंदी असलेल्या मराठा कुटुंबियांना कुणबी जातप्रमाणपत्र देण्यास सुरुवात केली. याच काळात राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी मनोज जरांगे यांच्याविरोधात भूमिका घेतली. या काळात भुजबळ आणि मनोज जरांगे यांच्यात मोठा संघर्ष झाला. दोघांनीही एकमेकांवर एकेरी



भाषेत आणि खालच्या पातळीवर जाऊन टीका केली.

छगन भुजबळांचा मनोज जरांगे यांच्याबरोबर संघर्ष चालू असताना त्यांना त्यांच्या पक्षातून हवा तसा पाठिंबा मिळाला नाही. तसेच भुजबळ आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर 'मराठा आरक्षणाचे विरोधक' अशी टीका होत होती. तर 'भुजबळ देवेंद्र फडणवीसांचा माणूस आहे', 'ते फडणवीसांची भाषा बोलत आहेत', अशी टीकादेखील झाली. या टीकेवर भुजबळ किंवा फडणवीस यांनी यापूर्वी कधी प्रतिक्रिया दिली नव्हती. फडणवीस यांनी अखेर आज यावर भाष्य केलं. ते टीव्ही ९ मराठीच्या वार्षिक कॉन्क्लेव्हमध्ये बोलत होते.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, भुजबळ कोणाचा माणूस आहे असं म्हणता येईल का? मी राजकारणात यायच्या आधीपासूनच ते राजकारणात वरिष्ठ पदावर आहेत. मी वयाच्या १९ व्या वर्षी १९८९ साली राजकारणात आलो. त्याच्या चार वर्षे आधी छगन भुजबळ मुंबईचे महापौर होते. काही बाबतीत आमच्यात साम्य आहे. भुजबळांचा इतिहास पाहिला तर त्यांचं मंडल आयोगावरून शिवसेनेशी भांडणं झालं होतं. मंडल आयोगाला शिवसेनेचा विरोध होता. परंतु, भुजबळ मंडल आयोगाचे समर्थक होते. त्यामुळे त्यांनी शिवसेना सोडली आणि ते शरद पवार यांच्याबरोबर गेले, ते काँग्रेसवासी झाले. त्यानंतर भुजबळ यांनी सातत्याने ओबीसींचा मुद्दा मांडला आहे.

ही गोष्ट खरी आहे की, मी सुद्धा माझ्या राजकारणाच्या पहिल्या दिवसापासून ओबीसींच्या बाजूने भूमिका ठेवली आहे. कारण माझं ठाम मत आहे की, आपल्याला सामाजिक न्याय करायचा असेल तर अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींना न्याय दिल्याशिवाय सामाजिक न्याय होऊ शकत नाही. त्याचप्रमाणे ओबीसींना न्याय दिल्याशिवाय सामाजिक न्याय होणार नाही. भुजबळांप्रमाणे माझीदेखील पहिल्या दिवसापासून ओबीसींच्या बाजूने भूमिका राहिली आहे. त्यांच्यात आणि माझ्यात हेच सर्वात मोठं साम्य आहे. आम्ही दोघेही ओबीसींच्या बाजूने आहोत.

दरम्यान, मी ओबीसींच्या बाजूने असलो तरी मी मराठ्यांच्या विरोधात नाही, असं म्हणत फडणवीस यांनी मराठा आरक्षणाविषयी त्यांची भूमिका स्पष्ट केली.

## अजित पवारांना बरोबर घेऊन शरद पवारांचा बदला घेतला का?

**मुंबई:माणदेश एक्सप्रेस**

२०१९ मध्ये महाविकास आघाडी सरकार स्थापन झालं. त्यानंतर अडीच वर्षांनी हे सरकार पडलं. कारण एकनाथ शिंदे यांनी सर्वात मोठं बंड पुकारून थेट पक्ष प्रमुख उद्धव ठाकरेंनाच आव्हान दिलं. जेव्हा या सगळ्या घडामोडी घडल्या तेव्हा देवेंद्र फडणवीस यांनी एक वक्तव्य केलं होतं. की होय मी बदला घेतला. काही दिवसांनी तो शब्द त्यांनी मागे घेतला. मात्र उद्धव ठाकरेंनी विश्वासघात केला होता त्याचा बदला मी घेतला हे वक्तव्य जाहीर मुलाखतीत देवेंद्र फडणवीस यांनी केलं होतं. आता देवेंद्र फडणवीस यांच्यासह सत्तेत अजित पवारही आहेत. अजित पवारांना बरोबर घेऊन शरद पवारांचा बदला घेतला का? या प्रश्नाचं उत्तर देवेंद्र फडणवीस यांनी दिलं आहे.

महाराष्ट्रात सुप्रिया सुळे विरुद्ध सुनेत्रा पवार अशी लढत झाल्यास पवार-विरुद्ध पवार संघर्ष पाहण्यास मिळेल.. याबाबत विचारलं असता देवेंद्र फडणवीस म्हणाले, पवार-विरुद्ध पवार असा संघर्ष बारामतीत पाहायला मिळू शकतो पण अशा गोष्टी राजकारणात होत असतात. शरद पवारांच्या आशीर्वादाने राज्यात मुंडे-विरुद्ध मुंडे संघर्ष पाहावा लागला. त्यांच्या आशीर्वादाने असे अनेक संघर्ष राज्याने पाहिले. आता कालचक्र याचं उत्तर त्यांना देतं आहे बाकी दुसरं काही नाही असं फडणवीस म्हणाले आहेत.

महाराष्ट्रातलं पवारपर्व होतं ते संपलंय का? हे विचारलं असता फडणवीस म्हणाले, मी पर्व वगैरे मानत नाही. ते महाराष्ट्रातले मोठे नेते आहेत. आजही ते संघर्ष करत आहेत. मात्र आज देशातली परिस्थिती एकच आहे लोकांना एकच नेतृत्व योग्य वाटतं ते मोदी यांचं नेतृत्व आहे.

राजकारणात आम्ही एक गोष्ट शिकलो आहे की कुणी धोका दिला, विश्वासघात केला तर त्याला उत्तर दिलं पाहिजे. राजकारणात अपमानही केले जातात त्याकडे दुर्लक्ष करता येतं. पण जर कुणी तुमचा विश्वासघात केला तर त्याला उत्तर दिलं पाहिजे. मी असं म्हणणार नाही की मी शरद पवार यांचा बदला घेतला. पण



माझ्याकडे संधी आली तर फायदा घेतला पाहिजे. माझ्याकडे संधी आली त्याचा फायदा मी घेतला. माझ्याबरोबर जेव्हा विश्वासघात होतो तेव्हा कालचक्र त्याचं उत्तर देतं.

उद्धव ठाकरेंना बरोबर घ्यायचं जाळं टाकत आहेत. संजय राऊत अजूनही बेशुद्धच आहेत का? त्यांना अजूनही हॅलोसिनेशन्स होतात का? आमच्याकडे दिल्लीत असे काही नेते नाहीत जे जाळं घेऊन फिरतात. महाराष्ट्राचा काही विषय असेल तर मला विचारलं जातं. महाराष्ट्राचा विषय असेल तर मला विचारलं जातं. त्यामुळे मला अद्याप कुणी विचारलेलं नाही की उद्धव ठाकरेंवर जाळं टाकायचं का? त्यामुळे उद्धव ठाकरेंवर अशा प्रकारे जाळं टाकण्यात आलं आहे हे स्वप्न जरी संजय राऊत यांना पडलं असलं तरीही तसं काहीही घडलेलं नाही.

उद्धव ठाकरेंनी महाविकास आघाडीबरोबर जाण्याचा निर्णय घेतला त्याचदिवशी लोकांचा उद्धव ठाकरेंवरचा विश्वास उडाला. बाळासाहेब ठाकरेंवर जो विश्वास जनतेने टाकला होता तशी उद्धव ठाकरेंची आता विश्वासार्हता उरलेली नाही. मतभेद संपवता येतात, मनभेद संपवणं कठीण असतं. रोज उद्धव ठाकरेंनी मोदींवर टीका केली, शब्द वापरले, त्यांच्या सरकारमध्ये माझ्यासहीत सगळ्यांना टार्गेट केलं आहे त्यामुळे आता मनभेद झालेत त्यामुळे त्यांना बरोबर घेणं शक्य आहे असं मला वाटत नाही. असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. टीव्ही ९ मराठीच्या लोकसभेचा महासंग्राम या कार्यक्रमात देवेंद्र फडणवीस यांनी हे वक्तव्य केलं आहे.






प्रार्थना म्हणजे प्रेम आणि समर्पण.
– ओशो

# संपादकीय

## राजकारणाची वाताहत

महाराष्ट्राचे राजकारण सध्या कोणत्या वळणावर आहे, याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केल्यास, आजमितीस राज्याचे राजकारण वेगळ्याच पातळीवर पोहचल्याचे दिसून येत आहे. वास्तविक पाहता महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपासून कधी नव्हे तो, महाराष्ट्र अस्थिर करण्याचा सातत्याने प्रयत्न सुरू आहे. त्यातच काही नेत्यांनी तर दररोज सकाळी उठून गटारगंगा आपल्या तोंडून ओतण्याची अखंडित परंपरा चालवली आहे. महाराष्ट्र हा छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा वैचारिक वारसा सांगणारा हा महाराष्ट्र आजमितीस अशांत करून सोडला आहे. या राज्यात कधी दंगली होतील, कधी अशांतता होईल, कधी राज्य बेचिराख करून टाकण्यासाठी प्रयत्न केले जाईल सांगता येत नाही. कायदा व सुव्यवस्था आपली रखेल असल्यासारखे काही जण वागतांना दिसून येत आहे. खरंतर भारतामध्ये लोकशाही असून, संविधानानुसार देशाचा कायदा चालतो. अशावेळी कायदा हा सर्वांसाठी समान आणि सारखाच असतांना, काही जण आपण कायद्यापेक्षा वेगळे असल्याचा भास निर्माण करतांना दिसून येत आहे. आपल्याकडे काही हजारो–लाखो कार्यकर्ते असल्यामुळे आपण पाहिजे ती गोष्ट करू शकतो, असा अविर्भाव काही जण बाळगतांना दिसून येत आहे. त्यामुळे त्यांना तुम्ही कायद्यापेक्षा मोठे नाहीत, ही समज देण्याची वेळ आलेली आहे. वास्तविक पाहता महाराष्ट्रात फोडा–फोडीचे राजकारण झाल्यामुळे अनेक पक्ष धास्तावलेले दिसून येत आहे. आपले राजकीय अस्तित्व संपते की काय, अशी भीती त्यांना दिसून येत आहे. त्यामुळे आपले राजकीय अस्तित्व शाबूत राहण्यासाठी या लोकांनी राज्याला अस्थिर करण्यासाठी डाव आखलेला दिसून येत आहे. वास्तविक पाहता महाराष्ट्रात सध्या राजकारण्यांनी रोजच शिव्यांचा शिमगा सुरू केला आहे. एकमेकांवर आरोपप्रत्यारोपांच्या फैरी झाडता झाडता शिव्या देण्यापर्यंत त्यांनी मजल मारली गेली आहे. हा शिमगा काही एक दिवस सुरू नाही, तर तो रोजच सुरू आहे. या शिमग्यामुळे महाराष्ट्राची संस्कृती रसातळाला चालल्याचे दिसून येत आहे. महाराष्ट्राच्या राजकारणांचा सध्या उकिरडा झाला आहे. नळावरच्या बायका जश्या सकाळी कर्णकर्कश आवाजात भांडण करतात, त्याचप्रकारे राज्यात देखील एकमेकांवर पत्रकार परिषदा घेऊन आरोप–प्रत्यारोपांच्या फैरी सुरू आहेत. बरं या आरोप–प्रत्यारोपांच्या फैरीत कोणताही तर्कशुद्धपणा नाही. एकमेकांना शिव्या काय, एकमेकांना धमक्या काय, या संपूर्ण प्रकरणावरून महाराष्ट्राचे राजकारण पार रसातळाला गेल्याचे दिसून येत आहे. महाराष्ट्राच्या मातीला जसा संत तुकाराम, नामदेव, ज्ञानेश्वर, एकनाथ यांचा वारसा आहे, तसाच तो वारसा महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा देखील आहे. या समृद्ध वारश्याने महाराष्ट्र समृद्ध झाला आहे. तीच परंपरा महाराष्ट्राच्या राजकारणात देखील कायम होती. एकमेकांवर संयमी भाषेत आणि चिमटे घेणारी, मार्मिक टीका केली जायची. त्यात एकप्रकारची खिलाडूवृत्ती होती, तशीच त्यात एकप्रकारे समोरच्या चुका दाखविण्याचा देखील प्रयत्न होता. शिवाय आपण चुकत असेल, तर समोरचा ते खुलेपणाने कबूल करायचा, आणि त्यात दुरूस्ती करायचा. मात्र गेल्या काही वर्षांत महाराष्ट्राच्या राजकारणांचा पार उकिरडा झाला आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात यशवंतराव चव्हाण, सुधाकर नाईक, वसंतदादा पाटील, वसंतराव नाईक, शरद पवार, शंकरराव चव्हाण यासारखे अनेक मुख्यमंत्री होऊन गेले आहेत. मात्र या कालावधीत कधी राजकारणांची पातळी खालावली नाही. किंवा राजकारणाचा पोत घसरला नाही. विधीमंडळात देखील आपल्या विद्वत्तापूर्ण भाषणांनी संपूर्ण विधीमंडळ दणाणून सोडणारे नेते महाराष्ट्रात होते. पण आता त्यांचा वारसा लोप पावतो की काय, अशी भीती आता वाटायला लागली आहे. त्यामुळे सर्वपक्षीय राजकीय नेत्यांनी आपल्या वाचाळ नेत्यांना आवर घालण्याची गरज आहे. आणि राजकारणाची गटारगंगा होण्यापासून वाचवण्याची खरी गरज आहे.

# निवडणूक लढणे सोपे नाही



भारताची ओळख जगभरात वेगळी आहे आपण अनेक गोष्टींमध्ये अग्रेसर असून विकासाच्या दिशेने देशाचे पाऊल पडत आहे. देशाची महत्त्वाची ओळख म्हणजे सर्वात मोठी लोकसंख्या, सर्वात मोठी लोकशाही, सर्वात मोठी निवडणूक आणि तितकीच महागडीही. आपण गरीब असलो तरी या बाबतीत आपल्यासमोर कोणतीच महाशक्ती टिकू शकत नाही अगदी सुपरपॉवरही. १९४७ पासून २०२४ पर्यंतच्या प्रवासात आपण बरेच काही मिळवले आणि पचविले देखील. या वाटचालीत निवडणुका सामान्यांच्या आवाक्याबाहेर जाताना दिसत आहेत.२०१९ च्या निवडणुकीत देशातील ९०० दशलक्ष मतदारांना आकर्षित करण्यासाठी राजकीय पक्षांकडून आणि उमेदवारांकडून सुमारे ६० हजार कोटी रुपये किंवा ८.७ अब्ज डॉलर खर्च करण्यात आले आणि ते २०१४च्या तुलनेत दुपटीपेक्षा अधिक होते. एका अहवालानुसार, देशातील प्रत्येक लोकसभा मतदारसंघात एका मतांसाठी सुमारे ७०० रुपये म्हणजे एकूण शंभर कोटी रुपये खर्च झाले. ही काही लहान रक्कम नाही. त्याचा तौलनिक अभ्यास करण्यासाठी अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीचे उदाहरण घेऊ.

२०१६च्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत ६.५ अब्ज डॉलर खर्च झाले. ही निवडणूक अमेरिकेतील सर्वात महागडी निवडणूक म्हणून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रिकॉर्डमध्ये नोंदली गेली.२००९च्या पंधराव्या लोकसभेच्या निवडणुकीचे बजेट भारतात मागच्या वेळी झालेल्या निवडणुकीच्या तुलनेत पंधरा पट अधिक होते. तत्पूर्वीच्या निवडणुकीचा विचार केला तर १९९३ मध्ये लोकसभा निवडणुकीवर ९ हजार कोटी, १९९९ मध्ये १० हजार कोटी, २००४ मध्ये ३० हजार कोटी आणि २०१९च्या निवडणुकीत ६० हजार कोटी रुपये खर्च झाले आहेत. या दृष्टीने २०१४च्या निवडणुकीत २००९च्या तुलनेत दीड पट अधिक खर्च झाल्याचे दिसते. याप्रमाणे २०१९ मध्ये २०१४ च्या निवडणुकीच्या तुलनेत दुप्पट खर्च झाला. खर्चाचा आलेख असाच राहिला तर २०२४च्या निवडणुकीत १ लाख २० हजार कोटी रुपये खर्च होऊ शकतात, असा अंदाज आहे.केवळ लोकसभा निवडणुकीचाच का विचार करायचा. देशातील लोकशाही व्यवस्थेतील पहिल्या पायरीवरच्या ग्रामपंचायत निवडणुकीचे देखील उदाहरण घ्या. उत्तर प्रदेशात सरपंचपदाच्या निवडणुकीत खर्चाची मर्यादा दहा हजार रुपये आहे, तर जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडणुकीची खर्चाची मर्यादा दीड लाख रुपये आहे. परंतु एवढ्यावर भागते का? प्रत्यक्षात सरपंचपदाची निवडणूक लढणारी व्यक्ती दररोज दहा हजार रुपयांपेक्षा अधिक खर्च करते.दारूपार्ट्या, मांसाहारी जेवणाचा बेत, प्रचारयंत्रणांवरील पेट्रोलचा खर्च, कधी पर्स तर कधी साड्या वाटप अशा खर्चाला काही मर्यादा नाही.

जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडणुकीतील खर्च तर कोटी रुपयांच्या घरात जातो. विधानसभा मतदारसंघ असोत किंवा लोकसभा मतदारसंघ असोत, आज निवडणुका खूपच महाग झाल्या आहेत. परिणामी, निवडणूक लढवणे ही बाब सामान्यांच्या आटोक्याबाहेर गेली आहे. लहान सहान पक्षांचे तर निवडणूक लढण्याचे कामच राहिलेले नाही.२०१९ मध्ये निवडणुकीतील खर्चाचा विचार केल्यास त्याच्या २० टक्के म्हणजे १२ हजार कोटी रुपये निवडणूक आयोगाने निवडणूक व्यवस्थेवर खर्च केले. ३५ टक्के म्हणजे २५ हजार कोटी रुपये राजकीय पक्षांकडून खर्च झाले. २५ हजार कोटी रुपयांपैकी भाजपने ४५ टक्के, काँग्रेसने २० टक्के आणि अन्य पक्षांनी ३५ टक्के खर्च केले. २०१९ मध्ये एकट्या सोशल मीडियावर ५ हजार कोटी रुपये खर्च झाले आहेत. खर्चाचा विचार केल्यास प्रत्येक उमेदवाराला खर्चाची सीमारेषा आखून दिली आहे. मात्र पक्षांवर खर्चाचे निर्बंध नाहीत.लोकसभा, विधानसभा निवडणुकीत पक्षाच्या उमेदवाराच्या समर्थनार्थ सभा, प्रचारफेरी, पदयात्रा आणि अन्य गोष्टींवर पाण्यासारखा पैसा खर्च केला जातो.

निवडणूक खर्चाबाबत 'सेंटर फॉर मीडिया स्टडीज'च्या अहवालानुसार प्रत्येक लोकसभा मतदारसंघात सरासरी शंभर कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च केला जातो. त्याचा मतदारनिहाय हिशेब लावला तर तो सातशे रुपये प्रति व्यक्ती येईल. अर्थात, हा केवळ निवडणुकीतील खर्चाचा अंदाज आहे. प्रत्यक्षात एक एक मत अमूल्य आहे. मग त्याची किंमत मतदारांकडून केली जात नसली तरी. परंतु पक्ष आणि उमेदवारांना त्या मताची किंमत चांगलीच ठाऊक असते. आपण निवडणुकीतील मोफत घोषणांना सोडून द्या, त्याला तर काही मर्यादाच नाही. या घोषणा एक एक मतांसाठी केल्या जातात. घटनेनुसार प्रत्येक प्रौढ व्यक्ती मतदानाचा हक्क बजावू शकते. मग तो कोणत्याही धर्माचा, जातीचा, रंगाचा असो. निवडणूक लढण्यासाठी पात्र व्यक्तींसाठी नियम निश्चित केले असून त्यानुसार मैदान आखले जाते.

मात्र आपल्या घटनेचा मतितार्थ असा की, सर्व भारतीय सुजाण नागरिकांनी निवडणूक लढण्याबाबत सक्षम होण्याचा विचार करायला हवा. पण निवडणूक लढण्यासाठी एकच मोठा अडथळा येऊ शकतो आणि तो म्हणजे पैसा. अमेरिकेत निवडणुकीच्या प्रचार मोहिमेसाठी उमेदवार स्वत: पैसा गोळा करतात. सर्व हिशेब जनतेसमोर मांडलेला असतो आणि पारदर्शकता असते. मात्र आपल्याकडे अशी पद्धत अद्याप विकसित झालेली नाही. निवडणुकीतील देणगी ही अजूनही छुपी बाब राहिलेली आहे. निवडणुकीतील खर्चाला मर्यादा आहे, मात्र ती मर्यादा ओलांडल्यानंतर कोणत्याही शिक्षेची तरतूद नाही. अशावेळी निवडणूक रोखे आणले गेले. आता काही नवीन योजना येईल का? की, सरकारच त्याला फंडिंग करण्याचा विचार करेल? किंवा पुन्हा जुन्याच वळणावर निवडणुकीची गाडी येईल? अजून काहीच ठरलेले नाही. स्वातंत्र्यानंतर एवढा प्रदीर्घ कालखंड लोटलेला असताना या मुद्द्यावर सजगतेने आणि गांभीर्याने तोडगा काढण्याची गरज निर्माण झाली आहे. अर्थात, निवडणुकीतील श्रीमंती ही चांगली बाब आहे आणि तो एकाअर्थाने विचाराचा भाग आहे. परंतु ते कायदेशीर आहे का? या प्रश्नाचे उत्तर मतदार आणि उमेदवारांना द्यावे लागेल, परंतु कधी? वास्तविक हा मुद्दा जनतेचा हक्क, कर्तव्य आणि त्यांच्या पैशाशी संबंधित आहे. सर्वात मोठी गोष्ट म्हणजे जनतेचा सहभाग हा कळीचा मुद्दा आहे.पण निवडणूक स्वस्त झाल्याशिवाय ते शक्य नाही.

# रविचंद्रन आश्विनचे विक्रमी ५०० बळी



**श्याम ठाणेदार**
**पुणे**





भारताचा ऑफ स्पिनर रविचंद्रन अश्विन याने इंग्लंड विरुद्धच्या राजकोट कसोटीत ५०० बळींचा टप्पा गाठत विक्रमी कामगिरी केली. कसोटी क्रिकेटमध्ये पाचशे बळी घेणारे मोजकेच गोलंदाज आहेत त्यात आता आश्विनचा समावेश झाला आहे. भारताच्या दृष्टीने पाहायला गेले तरी कसोटीत पाचशे बळी मिळवणारा तो भारताचा दुसराच गोलंदाज आहे. या आधी अशी कामगिरी भारताचा महान लेगस्पिनर अनिल कुंबळे यालाच करता आली आहे. म्हणजे त्याच्यापुढे आता फक्त अनिल कुंबळे आहे. अनिल कुंबळे याने ६०० च्या वर बळी घेतले आहेत याचाच अर्थ दोघांमध्ये आता फक्त १०० बळींचे अंतर आहे. आश्विन आता ३७ वर्षाचा आहे. त्याचा फॉर्म आणि फिटनेस उत्तम आहे त्यामुळे तो आणखी दोन अडीच वर्ष सहज खेळू शकतो. तो जर आणखी दोन अडीच वर्ष खेळला तर अनिल कुंबलेला मागे टाकून भारताकडून सर्वाधिक बळी मिळवणारा गोलंदाज ठरू शकतो. आज आश्विन हा जगातील सर्वाधिक धोकेदायक गोलंदाज समजला जातो विशेषतः भारतीय खेळपट्ट्यांवर तर तो अधिक धोकेदायक ठरतो. त्याने मिळवलेल्या ५०० बळीपैकी ३५० हून अधिक बळी त्याने भारतात घेतल्या आहेत. परदेशातही त्याची कामगिरी चांगली आहे. परदेशातही त्याने बळी मिळवलेले आहेत. इंग्लंड, ऑस्ट्रेलिया यासारख्या प्रबळ संघाविरुद्ध त्याने सातत्याने चांगली गोलंदाजी केली आहे. त्याने केवळ गोलंदाज म्हणून नाही तर फलंदाज म्हणूनही चांगली कामगिरी केली आहे. कसोटीत त्याने पाच शतके झळकावली आहेत. कसोटीत पाच शतके झळकवणे ते ही सातव्या, आठव्या क्रमांकावर येऊन ही साधी गोष्ट नाही. कसोटीत ५०० बळी आणि ५ शतक झळकावणारा तो एकमेव खेळाडू आहे. अशी कामगिरी एक चांगला अष्टपैलू खेळाडूच करू शकतो. आश्विनने हे करून आपण केवळ गोलंदाज नसून अष्टपैलू खेळाडू आहोत हे सिद्ध केले आहे. आश्विनने केवळ कसोटीतच नाही तर एकदिवसीय आणि टी २० सामन्यात ही चमकदार कामगिरी केली आहे. एकदिवसीय आणि टी २० सामन्यातही त्याने खूप बळी मिळवले आहे. कसोटी प्रमाणेच एकदिवसीय आणि टी २० सामन्यातही त्याने भारताला अनेक विजय मिळवून दिले आहेत. आश्विन हा भारताचा खराखुरा मॅच विनर खेळाडू आहे. २०११ साली जेंव्हा त्याने भारताकडून कसोटीत पदार्पण केले तेंव्हा अनिल कुंबळे निवृत्त झाला होता तर हरभजन सिंगचा उतरता काळ सुरू झाला होता. या दोघांनी जवळपास दीड दशके भारतीय फिरकी गोलंदाजीची धुरा सांभाळली होती त्यांच्या नंतर भारतीय फिरकीची धुरा कोण सांभाळणार हा प्रश्न होता कारण त्यावेळी त्यांची जागा घेणारा तर सोडाच पण त्यांच्या जवळपास जाऊ शकणारा एकही फिरकी गोलंदाज दिसत नाही. आश्विन ज्यावेळी आला त्यावेळीही तो इतकी मोठी मजल मारेल असे भाकीत कोणी केले नव्हते मात्र त्याने मिळालेल्या संधीचे सोने केले त्यामुळेच तो आज महान गोलंदाजांच्या पंगतीत बसला आहे. रविचंद्रन आश्विनने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करण्यापूर्वी देशांतर्गत क्रिकेट ही गाजवून सोडले होते. त्याने रणजी सामन्यात सातत्याने बळी मिळवले मात्र त्याला खरी ओळख मिळवून दिले ती आयपीएलने. आयपीएलमध्ये आश्विनने चेन्नई सुपरकिंग्ज संघाचे प्रतिनिधित्व केले. मुथय्या मुरलीधरन हा चेन्नई सुपरकिंग्जचा प्रमुख फिरकी गोलंदाज होता. कर्णधार महेंद्रसिंग धोनीला गोलंदाजीची सुरुवात फिरकीने करायची होती मात्र मुरलीधरन सुरुवातीलाच गोलंदाजी करण्यास तयार नसल्याने धोनीने चेंडू आश्विनकडे सोपवला. आश्विनने या संधीचे सोने करीत प्रतिस्पर्धी संघाची सलामीची फळी कापून काढण्याची कामगिरी केली तिथेच धोनीचा आश्विनवर विश्वास बसला. आयपीएलमध्ये सातत्याने चांगली कामगिरी केल्याने धोनीने त्याला भारताकडून खेळायची संधी दिली. आश्विनने धोनीने टाकलेला विश्वास सार्थ ठरवला. मागील १३ वर्षात त्याने भारताला अनेक अविश्वसनीय विजय मिळवून दिले आहेत आता त्याने भारताला जागतिक कसोटी अजिंक्यपद मिळवून द्यावे हीच त्याच्याकडून क्रिकेट प्रेमींनी अपेक्षा आहे. ५०० बळींचा टप्पा पार करणाऱ्या रविंचंद्रन आश्विनचे मनापासून अभिनंदन!!!

# दोन वर्षांत संपूर्ण महाराष्ट्रात गटशेतीचा कार्यक्रम राबविणार

## 'फार्मर कप २०२३' पुरस्कार वितरण सोहळ्यात आमिर खान यांचे प्रतिपादन

**पुणे/प्रतिनिधी:**
येत्या दोन वर्षांत संपूर्ण महाराष्ट्रात गटशेतीचा कार्यक्रम राबविणार आहे. या माध्यमातून शेकडो शेतकरी – उद्योजक घडवायचे आहेत, असे प्रतिपादन पानी फाऊंडेशनचे संस्थापक अभिनेते आमिर खान यांनी केले.





फाऊंडेशनच्या वतीने आयोजित 'सत्यमेव जयते फार्मर कप २०२३' पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. सह्याद्री फार्मचे संचालक विलास शिंदे हे यावेळी प्रमुख पाहुणे होते. पानी फाउंडेशनच्या संस्थापिका किरण राव, मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित भटकळ, सीईओ रीना दत्ता, मार्गदर्शक डॉ. अविनाश पोळ तसेच प्रसिद्ध अभिनेते जॅकी श्रॉफ, बॉलिवूड अभिनेता प्रकाश राज, अतुल कुलकर्णी, पुष्कर श्रोत्री, आदिनाथ कोठारे, दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर, अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, मंजिरी फडणीस इत्यादी मान्यवरांनी कार्यक्रमाला हजेरी लावली.

फार्मर कपमधील सहभागी शेतकरी गटांना मार्गदर्शन करणारे शास्त्रज्ञ, अहमदनगर येथील स्नेहालय आणि अंमळनेर येथील दीपस्तंभ संस्था तसेच सह्याद्री फार्म, से ट्रीज संस्था, उमेद संस्था, पोकरा संस्था, बजाज ऑटो लिमिटेड, एबीपी माझाचे राजीव खांडेकर, राज्यातील विविध कृषी विद्यापीठांतील शास्त्रज्ञ यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. तसेच यावेळी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणारे तज्ज्ञ डी. एल. मोहिते सर यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

राज्यातील १८ जिल्ह्यांतील ३९ तालुक्यांमधील ३००० गटांनी या स्पर्धेत भाग घेतला. यातील २१ गटांची अंतिम फेरीची निवड करण्यात आले. त्यातून कुंभारगाव ता. करमाळा जि. सोलापूर येथील कुंभारगाव ॲग्रो प्रोड्यूसर कंपनी यांना १५ लाख रुपयांचा प्रथम पुरस्कर देण्यात आला. घोडेगाव ता. खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर येथील आई जिजाई महिला शेतकरी गट आणि वारंगा तर्फ नांदापुर ता. कळमनुरी जि. हिंगोली येथील उन्नती शेतकरी गट यांना दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार विभागून आला. सन्मानचिन्ह आणि रोख ५ लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. शेरेवाडी ता. आटपाडी जिल्हा सांगली येथील प्रगती महिला शेतकरी गट आणि सौंदे ता. करमाळा जि. सोलापूर येथील रॉयल फार्मर शेती गट यांना तिसरा पुरस्कार विभागून देण्यात आला. २ लाख ५० हजार रुपये रोख आणि सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

आमिर खान म्हणाले, पानी फाउंडेशनला जवळपास १० वर्षे होत आहेत. सुरुवातीला जलसंधारणावर काम केले. तेव्हा महाराष्ट्रातील गावांनी हे दाखवून दिले की जगात काहीही अशक्य नाही. मात्र आता शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्याची गरज आहे हे कोविडच्या काळात लक्षात आले. तेव्हा शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य देण्याच्या विचाराने गटशेतीकडे वळलो. आता संपूर्ण महाराष्ट्रात गटशेतीचा कार्यक्रम राबविणार आहे. दोन वर्षांत संपूर्ण महाराष्ट्रात जाण्याचे लक्ष्य फाउंडेशनने बाळगले आहे. संपूर्ण महाराष्ट्र गटशेती करेल आणि आपण यश गाठू, तो दिवस दूर नाही.

सह्याद्री ॲग्रोचे विलास शिंदे म्हणाले, गट शेतीचा प्रयोग यशस्वी करणे हे केवळ एकीच्या माध्यमातून शक्य आहे. हे शेतकरी केवळ आपला नव्हे तर देशाचा प्रश्न सोडवत आहेत. देशातील विविध आंदोलने ही शेतीच्या प्रश्नांमुळे होत आहेत. मात्र जे सरकार करू शकत नाही ते शेतकरी करू शकतो, हे तुम्ही दाखवून दिले आहे. शेतकरी हा अन्नदाता किंवा बळीराजा आहे तसेच तो व्यावसायिक आहे. सर्वात अवघड व्यवसाय शेतकरी करतात. आता आपली स्पर्धा ही जागतिक पातळीवर आहे. गतशेतीच्या माध्यमातून आपण ही स्पर्धा जिंकू शकतो.

### महिलांचा मोठा सहभाग खूप आनंददायक:फडणवीस

यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेष व्हिडिओ संदेश पाठवून फार्मर कपला शुभेच्छा दिल्या. ते म्हणाले, सरकार शेतकऱ्यांसाठी अनेक योजना राबवत आहे. फार्मर कापच्या निमित्ताने सरकारी योजनांना चळवळीचे रूप आले आहे. फार्मर कपमध्ये महिलांचा सहभाग लक्षणीय आहे याचा मला आनंद आहे. या महिलांसाठी फाउंडेशनने विशेष पुरस्कार ठेवले आहेत ही कौतुकाची बाब आहे.

### हवामान बदल ही संकट आणि संधी:सत्यजित भटकळ

सत्याजित भटकळ म्हणाले, हवामान बदल ही शेतकऱ्यांसमोरची आजची सर्वात मोठी समस्या आहे. ही समस्या केवळ महाराष्ट्रापुरती नाही तर ती सगळीकडे आहे. हे संकट म्हणजे एक मोठी संधी आहे. सौर शेती, कार्बन शेती व पेट्रोलची शेती अशा माध्यमांतून शेतकऱ्यांना उत्पन्न मिळू शकते. शेतकऱ्यांनी व्यवसाय गट स्थापन करावेत. त्यासाठी पाणी फाऊंडेशनने प्रशिक्षणाची सोय केली आहे.

अभिनेते जितेंद्र जोशी आणि अभिनेत्री स्पृहा जोशी यांनी सूत्र संचालन केले तर आभार प्रदर्शन यांनी केले. यावेळी शेतकऱ्यांची महती गाणाऱ्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली.

## बोधकथा

### उपदेशकथा

भारतीय चित्रपट उद्योगाचा पाया घालणारे निर्माते, दिग्दर्शक दादासाहेब फाळके यांनी प्रतिकूल परिस्थितीत अनंत अडचणींना तोंड देऊन राजा हरिश्चंद्र, भस्मासुर–मोहिनी व सत्यवान–सावित्री हे चित्रपट तयार केले. लंडनमध्ये दादासाहेबांचे हे तिन्ही चित्रपट दाखवले गेले. त्यांचे तंत्रकौशल्य पाहून सर्वजण चकीत झाले. 'कायनोटोग्राफ' या नियतकालिकाने लिहिले, 'दादासाहेब इंग्लंडमध्ये जन्माला का आले नाहीत?' त्यावेळी सुप्रसिद्ध निर्माते सोसिल हेपवर्थ यांनी दादासाहेबांना इंग्लंडमध्ये भारतीय चित्रपट निर्माण करण्याची विनंती केली. भरघोस पगार, स्वातंत्र्य, सन्मान असलेली ऑफर दादासाहेबांनी नम्रतेने नाकारली. त्यांचे आभार मानले व म्हणाले, 'हा व्यवसाय केवळ स्वदेशी व्हावा म्हणून झटलो. भारतीय संस्कृती जगाला ज्ञात व्हावी म्हणून झटलो. भारतीय संस्कृती जगाला ज्ञात व्हावी म्हणून ध्यास घेतला. हा प्रस्ताव स्वीकारला तर माझ्या तत्त्वापासून ढळेन.' पुढे प्रचंड आर्थिक संकटे झेलून त्यांनी स्वदेशी चित्रपटाचा मार्ग स्वीकारला.

कथा उपदेश : ध्येयनिष्ठ व्यक्तींना लोभ, मोह विचलित करू शकत नाहीत. त्यांच्या अढळ तत्त्वनिष्ठेनेच मोठी कार्ये उभी राहतात.

## (गुरुवचन)

### गुण हीच महानता असते

एका दिवशी एक पंडित शास्त्रार्थ करण्यासाठी स्वामी दयानंद यांच्याकडे गेला. त्यावेळी स्वामी दयानंद जमीनीवर बसून काहीतरी लिखाण करत होते. त्यांनी त्या पंडिताला आपल्याजवळ एका आसनावर बसण्यास सांगितले. त्या पंडिताला आपल्या विद्ववतेचा अभिमान होता. यामुळे ते स्वामी दयानंद यांना कमी समजत असत. यामुळे स्वामी दयानंद यांनी त्याला जमीनीवर आपल्या जवळ असलेल्या आसनावर बसण्यास सांगितले. तेव्हा त्या पंडितास ही गोष्ट त्याचा अपमान असल्याचे वाटले. त्यांना वाटले ते तर सर्वश्रेष्ठ आहेत. यासाठी त्यांना स्वामी दयानंद यांच्यापेक्षा उंच आसन मिळायला पाहिजे. अशातच ते खाली आसनावर बसून आपला स्तर कसे कमी करु शकतात. असा विचार करुन ते उभेच राहिले.

स्वामी दयानंद यांनी पंडितांच्या मनातील अवस्था चांगल्याप्रकारे ओळखली. ते पंडीतजीला म्हणाले की, उंच आसनावर बसल्यास कोणी महान होत नाही. जर असे होऊ शकत असेल तर उंच झाडावर बसलेला कावळा सर्वाधिक पुजनीय आणि महान असता. महत्त्वाची गोष्ट म्हणजे, स्वामी दयानंद पंडीतजीशी बोलत असताना समोर एका झाडावर एक कावळा बसला होता. त्या कावळ्याकडे संकेत करत स्वामी दयानंद पंडित यांच्याशी पुन्हा बोलले महानता तर त्याग, परोपकार आणि विनम्रतासारख्या गुणांमुळे सिद्ध होते. कोणताही व्यक्ती त्याच्या गुणाने महान समजला जातो. उंच आसानावर बसल्यामुळे नाही. जर आपल्यामध्ये गुण असतील तर आपण खालच्या जागेवर बसूनही तेवढेच विद्वान असतो आणि जर गुणांचा अभाव असेल तर उंच ठिकाणी बसूनही वाईट समजले जाते. स्वामी दयानंद यांची ही गोष्ट ऐकून पंडीजींचे डोळे उघडले आणि त्यांनी स्वामीजवळ असलेले आसन ग्रहण केले.

## राशीभविष्य

शनिवार दि. २ मार्च २०२४

**मेष :** मित्र किंवा सहकारी यांच्यावर जास्त विश्वास करू नका. मान प्रतीष्टा कमी होईल. आखलेल्या योजना पूर्ण होणार नाही. प्रवास त्रासदायक राहील.

**वृषभ :** कोणत्यातरी कामात मिळालेले यश आपल्यास फायदेशीर राहणार आहे. घराची अडचण दूर होईल. व्यापार व्यवसाय चांगला चालेल. रागावर नियंत्रण हवे.

**मिथुन :** विरोधकांवर मात केल्यामुळे आपल्या किर्तीत वाढ होईल. व्यापाराचे क्षेत्र विस्तृत होईल. जीवन साथीशी चांगले संबंध राहतील. आरोग्याची काळजी घ्या.

**कर्क :** आपल्या आपक्षेप्रमाणे फळ मिळणार आहे. चैनीच्या वस्तू खरेदी करण्याचा योग आहे. जवळच्या व्यक्तीच्या आरोग्याची काळजी राहील.

**सिंह :** व्यवसायात अनकुल असे यश मिळेल. कौटुंबामध्ये सुख व शांतीचे वातावरण लाभेल. कोणावरही अंध विश्वास बाळगू नका.

**कन्या :** प्रयत्न केल्यास यश मिळणार आहे. अडकलेला पैसा मिळू शकतो. व्यापारात नवीन प्रस्ताव येतील. मुलांच्या कामाकडे लक्ष राहू द्या. सुखकारक प्रवास घडेल.

**तुळ :** आर्थिक लाभाचे प्रमाण चांगले राहील. एखादी भाग्यकारक घटना घडेल. काहींना प्रवासाचे योग येतील. नातेवाईकांचे विशेष सहकार्य लाभेल.

**वृश्चिक:** योजलेले काम वेळेत पूर्ण होतील. खर्च वाढणार आहे परंतु त्याच प्रमाणे उत्पन्न राहील. प्रत्येक्ष क्षेत्रात मान सन्मान मिळेल. कोणतेही काम जबाबदारीने करा.

**धनु :** प्रयत्न केल्यास यश मिळणार आहे. अडकलेला पैसा मिळू शकतो. व्यापारात नवीन प्रस्ताव येतील. मुलांच्या कामाकडे लक्ष राहू द्या. सुखकारक प्रवास घडेल.

**मकर :** आपल्या इच्छा आकांक्षा पूर्ण होण्याचे योग आहेत. प्रतिष्ठीत व्यक्तिशी संबंध वाढतील. मुलांची प्रगती राहील. जोखमीचे कामे आज करू नका.

**कुंभ :** मित्र किंवा सहकारी यांच्यावर जास्त विश्वास करू नका. मान प्रतीष्टा कमी होईल. आखलेल्या योजना पूर्ण होणार नाही. प्रवास त्रासदायक राहील

**मीन :** काम करण्याच्या पद्धतीत सुधारणा होईल. फायदेशीर व्यवहार राहतील. कौटुंबिक वातावरण चांगले राहिल. समाजात प्रतीष्ठा वाढेल. मशीन वहान सावधपूर्वक हाताळा.

दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन– ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

# कृषीविश्व






पूरक व्यवसाय

# शेतीला जोड ससेपालनाची!

*गेल्या काही दिवसांपासून शेतीला जोडव्यवसाय म्हणून इमूपालन, शेळी-मेंढीपालन याबरोबरच ससेपालनाचाही पर्याय शेतकरी निवडताना दिसत आहेत. आंध्र प्रदेश, कर्नाटक, महाराष्ट्र, केरळमधील शेतकरी या व्यवसायातून दरमहा भरघोस उत्पन्न मिळवत आहेत.  न्य व्यवसाय तुलनेने कमी आहेत. कमी भांडवल व जागा तसेच करण्यास अतिशय सोपा व्यवसाय म्हणून ससेपालनाकडे शेतकऱ्यांनी वळणे फायदेशीर ठरेल.*



शेतकऱ्यांना जोडधंदा म्हणून इमूपालन, शेळी-मेंढीपालन यासमवेतच ससेपालनाचा पर्यायही निवडता येईल. कमी भांडवल व जागा तसेच करण्यास अतिशय सोपा व्यवसाय म्हणून ससेपालनाकडे शेतकऱ्यांनी वळणे फायदेशीर ठरेल. सशांची वाढ झपाट्याने होत असल्याने यातून चांगल्यापैकी कमाई अल्प कालावधीत होऊ शकते. पशुतज्ज्ञांचा सल्ला घेऊन शेतकऱ्यांनी हा व्यवसाय केल्यास त्यातून चांगले अर्थार्जन मिळू शकते.

शेड, शेत किंवा झोपडीमध्ये ससेपालन करता येते. आंध्र प्रदेश, कर्नाटक, महाराष्ट्र, केरळमधील शेतकरी या व्यवसायातून दरमहा भरघोस उत्पन्न मिळवतात. रंगीबेरंगी व निरोगी ससेपालनामुळे त्यांच्या विक्रीची चिंता नसते. मुख्य म्हणजे या व्यवसायात तुलनेने कमी स्पर्धा आहे. शिवाय, यासाठी कोणत्याही सरकारी परवानगी किंवा कागदपत्रांची गरज भासत नाही. कोंबडी, शेळ्या-मेंढीपालनातून क्वचितप्रसंगी दुर्गंधी अथवा विशिष्ट गंध निर्माण होऊ शकतो. तसा ससेपालनातून होत नाही, ही या व्यवसायाची जमेची बाब होय.

अल्प भांडवल, कमी जागा, अत्यल्प परिश्रम ही या व्यवसायासाची प्रमुख वैशिष्ट्ये म्हणता येतील. पोल्ट्री फार्मसाठी ज्याप्रमाणे विद्युत दिव्यांची गरज असते, त्याप्रमाणे ससेपालनासाठी वीजेची गरजही भासत नाही. शिवाय, सशांना खाद्यही कमी लागत असल्याने त्यावर होणारा खर्चही फारसा नाही. ससेपालनामध्ये रोगांचीही फारशी भीती नसते.

ससेपालनासाठी प्रामुख्याने ब्रिडर ससे खरेदी करावेत. त्यासाठी जाळीचे बंदिस्त आवरण तयार केल्यास उत्तम! ब्रिडर ससे दर दीड महिन्याला पिले देतात. एकावेळी ब्रिडर ससा किमान ६ ते ७ पिले देतो. ब्रिडर ससे आपल्या पिलांना एक महिनाभर दूध पाजतात. त्यानंतर पिले खाद्य खाऊ लागतात. अशी पिले केवळ चार महिन्यातच अडीच ते साडेतीन किलो वजनाची होतात. मोठ्या व वजनदार सशांच्या मांसाला बाजारात चांगली किंमत मिळते. एक ससा किमान १०० रुपये किलोने विकला जातो. आपल्या गरजेप्रमाणे व जागेच्या उपलब्धतेप्रमाणे शेतकरी कितीही ससे पाळू शकतात.

ब्रिडर ससे किमान १०० ते २०० घेतल्यास दरमहा ठराविक उत्पन्न मिळू शकते. किमान ५० ससे असले तरी दरवेळी ४४० ते ५०० याप्रमाणे तीन हजारांहून अधिक ससे आपल्याला वर्षभरातच मिळतात. प्रत्येक सशाची किंमत अंदाजे त्याच्या वजनाप्रमाणे तीन-चारशे रुपयांपर्यंत मिळते. याप्रमाणे वर्षभरात चांगली आर्थिक कमाई होऊ शकते.

केरळसह काही राज्यातील लोक अधिकांश मांसाहारी असून तेथे सशांना चांगली किंमत मिळते. अर्थातच केरळमध्ये सशांच्या मांसाला मोठी मागणी आहे. त्या राज्यात तीस हजारांहून अधिक लोक ससेपालनाचा व्यवसाय करतात तरी दिवसेंदिवस तेथील मागणी वाढती आहे. याशिवाय अनेक हॉटेल्समधूनही सशांच्या मांसाला वाढती मागणी आहे. सशाचे मांस कोवळे व लुसलुशीत  असल्याने मांसाहारी मंडळी हे मांस खाण्यासाठी आग्रही असतात. सशापेक्षा चिकनमध्ये चौपट चरबी अधिक असते. चिकन खाल्ल्याने अनेकांना लठ्ठपणा जडू शकतो. त्यामुळेही सशाचे मांस चोखंदळपणे निवडताना दिसतात. याशिवाय सशांमध्ये चिकनपेक्षा प्रथिने (प्रोटीन्स) चौपट असतात.

एक किलो चिकनमध्ये निम्मी हाडे असतात. याउलट सशांमध्ये हाडांचे प्रमाण तुलनेने अल्प आहे. सशात ३० टक्के हाडे व ७० टक्के मांस मिळते. त्यामुळेच सशाचे मांस खाण्याला प्राधान्य दिले जात असावे.

सशाचे मांस विक्री करून जितका पैसा मिळतो, त्याहून अधिक पैसा त्याच्या कातडीच्या विक्रीतून मिळत असतो. सशाच्या चामड्यापासून विविध आकर्षक वस्तू बनवता येतात. लेडीज पर्स, लहान मुलांचे कपडेही सशाच्या चामड्यातून बनविले जातात. केरळमध्ये गेल्या दीड दशकापासून या व्यवसायासाठी राष्ट्रीयीकृत बँका शेतकऱ्यांना व इच्छुकांना कर्ज देतात. महाराष्ट्रातही असे प्रयत्न शेतकरी आणि बेरोजगार युवकांनी करून पहावयास हरकत नाही.ससेपालनातून देशाच्या परकीय गंगाजळीतही भरघोस भर पडते. रशिया, जर्मनी, पोर्तुगाल, आखाती देश, चीन, जपानसारख्या देशातही सशाचे मांस आवडीने खाल्ले जाते. त्यामुळे तेथील सशाच्या मांसाची मागणीही वाढती आहे. अमेरिका, चीनसह अनेक देशांत सशांच्या चामड्यापासून बनवल्या जाणाऱ्या वस्तुंना वाढती मागणी आहे. ससे मोठ्या प्रमाणावर निर्यात करणेही शक्य आहे. शेतकऱ्यांनी पन्नास जणांचा गट तयार करून हा व्यवसाय केल्यास ससे निर्यातही केले जाऊ शकतात.

कमी भांडवलात व अत्यल्प कालावधीत उत्पन्न देणारे ससेपालनासारखे अन्य व्यवसाय तुलनेने कमी आहेत.  महाराष्ट्रात अनेक बेरोजगारांनी व शेतकऱ्यांनी ससेपालनात रुची दाखवली असून त्यांना चांगले उत्पन्नही मिळत आहे. विदर्भ, मराठवाडा, खानदेश, पश्चिम महाराष्ट्रातही या व्यवसायाला चांगला वाव आहे. यातून शेतकऱ्यांना आर्थिक हातभार मिळून त्यांच्या विवंचना कमी होण्यास मदत होऊ शकेल.



# उडदामाजी...

उडीद या पिकाला मध्यम ते भारी, पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन आवश्यक असते. क्षारयुक्त, खोलगट, पाणथळ तसेच उतारावरील हलकी, निकस जमिनीत उडीद पिकाची लागवड करु नये.  तुलनात्मकदृष्ट्या या पिकाखाली जळगाव, उस्मानाबाद, औरंगाबाद, अकोला, बुलढाणा आणि धुळे जिल्ह्यात अधिक क्षेत्र आहे.

भारी, काळ्या जमीनीमध्ये आणि वार्षिक सरासरी ६००-७५० मी.मी. पावसाच्या भागात हे पीक चांगले येते. मध्यम, भारी जमिनीतसुद्धा या पिकाचे समाधानकारक उत्पादन मिळते. फुलोरा येण्याच्या काळात पाऊस पडल्यास दाणे पोसले जाऊन उत्पादन अधिक मिळते. निचऱ्याची जमीन तसेच पोयट्याची जमीन या पिकासाठी योग्य असते.  या पिकाला मुगाप्रमाणेच पूर्वमशागत करावी. मिश्र पीक असल्यास मुख्य पिकाची मशागत पुरेशी होते. या पिकाला हेक्टरी २० किलो ग्रॅम नत्र आणि ४० किलोग्रॅम स्फुरदाची मात्रा द्यावी.

उडीद हे कडधान्य पिक मध्यम ते भारी जमिनीत घेतले जात असल्याने जमिनीची खोल नांगरट करुन जमीन भुसभुशीत करणे आवश्यक असते. मृगाचा पहिला मोठा पाऊस पडून गेल्यावर ट्रॅक्टरने हॅरो मारुन घ्यावा. यामुळे ढेकळे फुटून काडी कचरा वेगळा होतो. ही धसकटे, काडी, कचरा व्यवस्थित वेचून घ्यावा. कुळवाच्या एक दोन पाळ्या द्याव्यात. म्हणजे जमीन भुसभुशीत होऊन पेरणी योग्य होईल. पिकाचे अपेक्षित उत्पादन मिळवण्याच्या दृष्टीने हेक्टरी रोपांची संख्या योग्य प्रमाणात असणे आवश्यक आहे. पेरणी करताना पुरेसे बियाणे आणि योग्य अंतरावर पेरणी करणे हितावह ठरते. उडीद पिकाकरीता १५ ते २० किलो प्रति हेक्टरी बियाणे वापरावे. दोन ओळींमध्ये ३० सेंमी आणि दोन रोपांमध्ये दहा सेमी अंतर ठेवून पेरणी करावी. महाराष्ट्रात हे पीक खरीप हंगामात घेण्यात येते. पिक वेळेवर निघून रब्बीची पूर्व मशागत करण्यास वेळ मिळतो. दोन ओळीतील अंतर ३० सें.मी. ठेवून हेक्टरी १५ ते २० किलो बियाणे पेरावे. पेरणीपूर्वी बियाण्याच्या रायझोबियम जीवाणू संवर्धकाची प्रक्रिया केल्यास उत्पादनात साधारणपणे १० ते २० टक्के वाढ होते. एक हेक्टरसाठी लागणाऱ्या बियाण्यास जीवाणूचे दीड पाकीट पुरते. पेरणीनंतर दोन ते तीन आठवड्यांनी १० सें.मी. अंतर ठेवून विरळणी करावी.

सिंदखेड १-१, नं- ५५ आणि जी- ६-७ हे जुने वाण महाराष्ट्रात बऱ्याच दिवसांपासून लागवडीखाली आहे. टी-९ या लवकर येणाऱ्या वाणाची लागवड मोठ्या प्रमाणात करण्यात येत असून यापासून जास्त उत्पादन येते. यामुळे कमी पावसातही त्याच्या उत्पादनात विशेष घट येत नाही. अलिकडेच भाभा आण्विक संशोधन केंद्र, ट्रॉम्बे मुंबई आणि पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला यांनी संयुक्तरित्या संशोधन केलेली टी.ए.यु - १ ही जात विदर्भासाठी प्रसारीत केलेली आहे.

पेरणीपासून तीन आठवड्यांनी पहिली खुरपणी करावी. आवश्यकतेनुसार आणखी एक खुरपणी १५ दिवसांनी करावी. या पिकाला मुगाप्रमाणेच मुख्यतः मावा, पिसू, भुंगेरे आणि  पाने खाणाऱ्या अळीचा उपद्रव होतो. मावा ही कीड पानांच्या मागच्या बाजूस राहून रस शोषण करते. या किडींचा प्रादुर्भाव दिसू लागताच त्यांच्या बंदोबस्तासाठी बी.एच.सी. १० टक्के भुकटी हेक्टरी २० किलो वारा शांत असताना धुरळावी.  उडीदाच्या पिकावर मुख्यतः भुरी रोगाचा प्रादुर्भाव होऊन पाने पांढरी होऊ लागतात. रोगांची लक्षणे दिसू लागताच ३०० पोताची गंधक भुकटी हेक्टरी २० किलोग्रॅम या प्रमाणात वारा शांत असताना धुरळावी. प्रतिबंधक उपाय वेळेवर न केल्यास पीक हातचे जाण्याची भिती असते. सुमारे ७० ते ७५ दिवसात पीक तयार होते. पीक तयार झाल्यावर उपटून शेंगा तोडून वेगळ्या कराव्यात. शेंगा चांगल्या वाळल्यानंतर बैलांच्या सहाय्याने तुडवून किंवा काठीने बडवून मळणी करावी. नंतर उफणणी करुन बी अलग करावे. साठवण करण्यापूर्वी धान्य एक दोन दिवस उन्हात वाळवावे. हेक्टरी सरासरी ६०० ते ७०० किलो उत्पादन मिळते.

# भातासाठी श्री पध्दत

*आपल्या देशात भाताचे उत्पन्न मोठ्या प्रमाणावर होते. या पिकाची लागवड अधिक चांगल्या पध्दतीने होण्यासाठी श्री पध्दत ही भात लागवडीची सुधारीरत पध्दत अस्तित्वात आली आहे.*

श्री म्हणजे सिस्टिम ऑफ राईस इंटेसिफिकेशन. ही एक भात लागवडीची सुधारीत पद्धत आहे. या पध्दतीने भात लागवड करण्याची सुरूवात १९८० च्या दशकात मादागास्कर या देशात झाली. सुमारे १९९७ पर्यंत ही पध्दत बाहेरच्या देशांना माहीत नव्हती. सन १९१९ मध्ये ही पद्धती चीनमध्ये पहिल्यांदा घेण्यात आली. सन २००० पासून ही पध्दती एकूण १५ देशांमध्ये वापरण्यात येते. जमीन, पाणी, मजूर आणि भांडवल अशा उपलब्ध स्त्रोतांपासून भाताचे उत्पादन जास्तीतजास्त मिळविणे तसेच शेतकरी आणि ग्राहक यांचा फायदा कसा होईल आणि निसर्गाचे संतुलन राहील हा प्रमुख उद्देश श्री पद्धतीचा कसा आहे. श्री पध्दतीमुळे प्रकाश संश्लेषणाची परिणामकारकरित्या अभिक्रीया होऊन मुळांची वाढही चांगली होते. प्रत्येक रोपाची निरोगी वाढ होऊन मुळांची वाढही चांगली होते. प्रत्येक रोपाची निरोगी वाढ होऊन किड, रोग यापासून संरक्षण होते. पाण्याचे प्रमाण कमी लागून ४० टक्के इतकी पाण्याची बचत होते. जमिनिची सुपिक्ता वाढते आणि भाताच्या उत्पादनात वाढ होते.

शेती लागवड



# पर्याय वाईनसाठी द्राक्षांचा



*गोड चवीच्या द्राक्ष लागवडीच्या तुलनेत वाईनसाठी वापरण्यात येणाऱ्या आंबट द्राक्षांच्या लागवडीसाठी कमी खर्च येतो आणि बाजारातही त्याला चांगला भाव मिळतो. त्यामुळे या जातीच्या द्राक्षांची लागवड करणे हा चांगला पर्याय आहे.*

जर्मनी, इटली, स्पेन, फ्रान्स, अमेरिका, कॅनडा, दक्षिण आफ्रिका या देशात ८०ते ९० टक्के द्राक्षाची लागवड वाईनसाठी उपयुक्त असलेल्या  जातींची करतात. याउलट आपल्याकडे ७५ ते८५ टक्के द्राक्ष लागवड ही गोड ताज्या फळांच्या जातींनी होते. वाईनसाठी आंबट जातींची द्राक्ष उपउक्त असतात तर ताज्या फळांसाठी तसेच मनुके तयार करण्यासाठी गोड जाती उपयुक्त असतात. वाईनसाठी प्रति एकरी द्राक्ष लागवडच्या तुलनेत गोड जातींच्या द्राक्ष लागवडीस दुप्पट खर्च येतो. तसेच वाईन जातींची द्राक्षे आंबट असल्यामुळे पीक संरक्षणाला खर्च कमी लागतो, पाणी कमी लागते आणि हलक्या जमिनीवरही चांगले उत्पादन मिळू शकते.

शिवाय आंबट असल्यामुळे पीक संरक्षणाला खर्च कमी लागतो, पाणी कमी लागते आणि हलक्या जमिनीवरही चांगले उत्पादन मिळू शकते. शिवाय आंबट द्राक्षांच्या घडांना आकार देणे, विरळणी करणे.  यासाठीचा मजुरी खर्च लागत नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे वाईनच्या द्राक्षांना शेतात गोड द्राक्षांच्या तुलनेत दुप्पट ते तिप्पट भाव मिळतो. म्हणून स्थानिक स्तरावर जर वाईन तयार करण्याचे लघुउद्योग जर सुरू झाले तर शेतकरी वाईन जातीच्या द्राक्ष लागवडीकडे वळतील.

# फळांची विरळणी

जाणून घ्या

*फळझाडावर प्रमाणापेक्षा जास्त फळे झाली तर झाडाला ती पेलवत नाहीत. त्यामुळे त्यांची विरळणी करावी लागते.*



एखाद्या  फळझाडावर असलेल्या फळांमधून काही फळे काढून टाकणे यास फळांची विरळणी असे म्हणतात. फळवाढीच्या अवस्थेवरून आणि वेळेवरून फळांच्या विरळणीला लवकरची विरळणी आणि उशिरा विरळणीला उशिरा विरळणी असे म्हणतात. फळझाडावर प्रमाणापेक्षा अधिक फळधारणा झाली तर फळांची गर्दी वाढते. गर्दीमुळे काही फळे आकाराने लहान किंवा वेडीवाकडी वाढतात. त्यामुळे एकूण उत्पादनात घट येते. तसेच अधिक फळधारणा झाल्यानंतर ती सर्वच्या सर्व फळे पोसण्याची झाडाची कुवत कमी पडल्यामुळे फळांची गळ होते. त्यामुळे झाडातील अन्न वाया जाते. फळझाडांची फळे पोसण्याची कुवत लक्षात घेऊन त्या प्रमाणात फळे राखली तर फळवाढीच्या काळात फळांची वाढ आणि शाखीय वाढ यामध्ये समन्वय साधला जातो.

# शेतमाल ठेवा तारण

शेतीमालाची हंगामात एकदम आवक वाढून भाव कोसळतात. अशा परिस्थितीत बिगर-नाशवंत शेतीमाल तारणात ठेवल्यास शेतकऱ्यांची आर्थिक नड भागते. तसेच काही कालावधीनंतर शेतीमालाचे भाव वाढून त्याचा फायदा होतो. कृषी पणन मंडळाने ही योजना १९९० पासून यशस्वीपणे राबवली आहे. शेतीमालाचे बाजारभाव कमी झाल्यास शेतकरी आपला माल बाजार समितीकडे तारणात ठेवून  त्या मालावर बाजार समिती ६ टक्के व्याजदराने १८० दिवसांच्या मुदतीकरिता शेतकऱ्याला तात्काळ कर्ज उपलब्ध करून देते. बाजार समित्यांनी शेतकऱ्यांना दिलेल्या कर्ज रकमेची प्रतिपूर्ती पणन मंडळामार्फत केली जाते.

या योजनेअंतर्गत तूर, मूग, उडीद, सोयाबीन, करडई, धान, ज्वारी, बाजरी, मका, चणा, हळद या शेतामालाचा समावेश करण्यात आला आहे. या शेतीमालाच्या त्या दिवसाच्या बाजारभावाच्या ७५ टक्के रक्कम तारण कर्ज म्हणून दिली जाते. काजू बीची बाजारभावाने होणाऱ्या एकूण किमतीच्या ५० टक्के किंवा १५ रूपये प्रती किलो यापैकी कमी असणारी रक्कम शेतकऱ्यास मिळेल. बेदाणा शेतमालाच्या बाजारभावानुसार  एकूण किमतीच्या ५० टक्के किंवा  ३०,००० रूपये प्रती टन यापैकी कमी असणारी रक्कम दिली जाईल. बेदाण्यासाठी ८ टक्के व्याजदर आहे.ज्वारी, बाजरी, मका, गहू या पिकांसाठी बाजारभावानुसार एकूण किमतीच्या ५० टक्के अथवा ५०० रूपये प्रति क्विंटल यापैकी कमी असणारी रक्कम मिळेल. या योजनेच्या लाभासाठी नजीकची उत्पन्न बाजार समिती अथवा कृषी पणन मंडळाचे मुख्य अथवा विभागीय कार्यालयाशी संपर्क साधावा.



# गीतरामायणाच्या सादरीकरणाने सातारकर रसिक मंत्रमुग्ध

## मसाप,शाहूपुरी,सातारा नगरपालिका आयोजित मराठी भाषा पंधरवड्याचा प्रारंभ

***सातारा/प्रतिनिधी:***

मराठी भावगीताचे अत्युच्च शिखर म्हणजे अर्थातच गीतरामायण. मराठी माणसांच्या मनात जेथे पवित्र व सुंदर गोष्टी वास करतात, तेथे गीतरामायणाने स्थान मिळवले आहे. गदिमा आणि बाबूजींच्या रुपाने मराठीजणांना जणू श्रीरामांचा आशीर्वाद मिळाला आहे, अशा या गीतरामायणांच्या सादरीकरणाने सातारकर रसिक मंत्रमुग्ध झाले. कलाकरांनी सादर केलेल्या गीताबरोबरच गदिमांचे सुपुत्र आनंद माडगूळकर यांनी सांगितलेल्या गदिमांच्या आठवणी, गोष्टी, किस्से, त्याचबरोबर सातारकर रसिकांनी दिलेला वन्समोअर आणि कोरस यामुळे कार्यक्रम उत्तरोत्तर रंगत गेला. निमित्त होते मसाप, पुणे शाहुपुरी शाखा आणि सातारा नगरपालिका आयोजित पहिला मराठी भाषा पंधरवड्याच्या १३ वे वर्षाचे उद्घाटन.

आधुनिक वाल्मिकी असा आदरयुक्त उल्लेख ज्यांचा केला जातो ते लेखक, ज्येष्ठ कवी गदिमा यांच्या लेखणीतून उमटलेले गीतरामायण शाहूकलामंदिर येथे गायक अभिजित पंचभाई, हेमंत वाळुंजकर, श्रुती देवस्थळी, मीनल पोंक्षे, हार्मोनियम प्रसन्न बाम, तबला अभिजित जायदे, ताल वाद्य राजेंद्र साळुंखे यांनी सादर केले तर निवेदन होत स्नेहल दामले यांचे. गीतरामायण ऐकणे म्हणजे जणू एक श्रीराम चरित्राचे पारायणच. अशा या पारायणाची सुरुवात आनंद माडगूळकर यांनी गोंदवलेकर महाराजांच्या स्तवनाने केली. वेळेची मर्यादा लक्षात घेता उपस्थित कलाकारांनी गीतरामायणातील महत्वाचे प्रसंग सादर भावोत्कट पध्दतीने सादर केल्याने शाहू कलामंदिर जणू अयोध्या नगरीच अवतरल्याचा भास निर्माण झाला होता. 'कुश लव रामायण गाती', 'अयोध्या मनोनिर्मिती नगरी', 'राम जन्मला ग सखे राम जन्मला', 'विश्वामित्र मागती', 'रामा चरण तुझे लागले आज मी शापमुक्त झाले', 'सीता स्वयंवर', 'आकाशी जसे जडले नाते',अशी एकाहून एक सरस गीते सादर केल्याने सातारकर रसिकांनी त्याला भरभरुन प्रतिसाद दिला. टाळ्याचा कडकडाट, वन्स मोअर आणि काही ठिकाणी सातारकरांनी दिलेला कोरस यामुळे शाहू कलामंदिर भारावून गेले होते. त्याच जोडीला गदिमांचे सुपुत्र आनंद माडगूळकर यांनी सांगितलेले गदिमांचे किस्से, आठवणी, गोष्टी यामुळे कार्यक्रम आणखीच बहारदार झाला.

प्रारंभ मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून मराठी भाषा पंधरवड्याचा प्रारंभ करण्यात आला. यावेळी मसाप पुणे प्रमुख कार्यवाह सुनिताराजे पवार, आनंद माडूगळकर, मसाप पुणे शाहुपुरी शाखेचे अध्यक्ष विनोद कुलकर्णी, पत्रकार दीपक शिंदे आणि मान्यवर उपस्थित होते. त्यानंतर संयोजकांच्यावतीने मान्यवरांचा आणि कलाकारांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना मसाप पुणेचे प्रमुख कार्यवाह सुनिताराजे पवार म्हणाल्या, मसाप, शाहुपुरी शाखेने जो जो उपक्रम केला तो यशस्वी करुन दाखवला आहे. त्यांचे सगळेच उपक्रम स्तुत्य असतात. साहित्यिक बंधुभाव निर्माण करण्याचे काम साहित्य परिषद करते. व्यवहार, शैक्षणिक आणि कलेची मराठी भाषा वेगली आहे. जोपर्यंत कला जिवंत आहे तोपर्यंत माय मराठी तरेल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. पत्रकर दीपक शिंदे यांनी मराठी भाषेचे महत्व सांगत वर्षातून केवळ महाराष्ट्र दिन, मराठी भाषा दिन, वाचणा प्रेरणा दिन या दिवशी मराठी भाषेचे स्मरण न करता दैनंदिन मराठी वापरासाठी आग्रह धरला पाहिजे. त्यासाठी शालेय व्यवस्था दुरुस्त करणे, नियोजन करणे आणि आराखडा तयार करणे आवश्यक असल्याचे सांगितले. प्रास्तविकात मसाप पुणे शाहुपुरी शाखेचे अध्यक्ष विनोद कुलकर्णी यांनी मराठी भाषा पंधवड्यात गेल्या १३ वर्षांपासून सातत्य ठेवलेली मसाप पुणे शाहुपुरी शाखा एकमेव आहे. आमच्या सगळ्यांना उपक्रमांना मसाप पुणेचे पाठबळ आणि सहकार्य मिळत असते. शाखेच्या बा.सी.मर्ढेकरांच्या घराचे नूतनीकरण आणि स्मारकात रुपांतर या उपक्रमाचे महाराष्ट्रातून कौतुक, अभिनंदन होत असून पदाधिकारी आणि सातारकरांच्या सहकार्यामुळे हे शक्य झाल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नंदकुमार सावंत यांनी केले तर आभार ड. चंद्रकांत बेबले यांनी मानले. कार्यक्रमास किशोर बेडकिहाळ, डॉ. उमेश करंबेळकर, शिरीष चिटणीस, डॉ. राजेंद्र माने, अजित साळुंखे, प्रा. श्रीधर साळुंखे, ड. बाळासाहेब बाबर, प्रवीण पाटील, वजीर नदाफ, तुषार महामूलकर, सचिन सावंत, संजय माने, मसाप शाहुपुरी शाखेचे सदस्य, पदाधिकारी आणि सातारकर रसिक उपस्थित होते.



मराठी भाषा पंधवड्याचा दीपप्रज्वलन करुन प्रारंभ करताना मसाप पुणे प्रमुख कार्यवाह सुनिताराजे पवार, आनंद माडगूळकर, विनोद कुलकर्णी, दीपक शिंदे, नंदकुमार सावंत तर दुसऱ्या छायाचित्रात गीतरामायण सादर करताना कलाकार.

मराठी भाषा पंधवड्यातील दुसरा कार्यक्रम शनिवार दि.२ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता नगरवाचनालयाच्या पाठक हॉल येथे होणार आहे. अलिबाग येथील सुप्रिया राज यांचा काश्मिरीयत हा कार्यक्रम होणार आहे. त्यात काश्मिरच्या अंतर्गत भागात स्वत: एकटे फिरताना आलेले अनुभव त्या कथन करणार आहेत.

# पी.आर.पाटील,संजय खताळ हे दुबई येथील आंतरराष्ट्रीय साखर परिषदेत सहभागी होणार

***इस्लामपूर/प्रतिनिधी:***

महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघाचे अध्यक्ष पी. आर. पाटील (दादा) व व्यवस्थापकीय संचालक संजय खताळ हे दुबई येथे दि. ४ ते ७ मार्च रोजी होणाऱ्या आंतरराष्ट्रीय साखर परिषदेत सहभागी होणार आहेत. या जागतिक स्तरावर महत्वाच्या मानल्या जाणाऱ्या परिषदेत जगातील साखर उद्योगातील दिग्गज व तज्ञ सहभागी होणार आहेत. माजी मंत्री आ.जयंतराव पाटील यांच्यासह अनेक मान्यवरांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

साखर उद्योग,या उद्योगासमोरील आव्हाने, नवीन तंत्रज्ञान आदी विषयावर चर्चा केली जाणार आहे. तसेच साखर उद्योग हा ऊर्जा उद्योग बनत चालला आहे. संपूर्ण जगात पेट्रोल,डिझेलला इथेनॉल आणि त्याच्या पुढे जाऊन हरित ऊर्जा हा उत्तम पर्याय ठरत आहे. २०७० पर्यंत संपूर्ण जग प्रदूषण मुक्त करावयाचे आहे. आपल्या भारत देशाने २०५० पर्यंत ७० टक्के,तर २०७० पर्यंत १०० टक्के प्रदूषण मुक्तीची हमी दिली आहे. त्या दृष्टीने ही परिषद अत्यंत महत्वाची



असल्याचे पी.आर.(दादा) पाटील यांनी सांगितले.

पी.आर.दादा हे सहकारी साखर कारखान दारीतील जेष्ठ व तज्ञ म्हणून ओळखले जातात. त्यांनी राज्यातील आघाडीच्या राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखान्याचे संचालक म्हणून ५७ वर्षे, तर कारखान्याचे अध्यक्ष म्हणून २८ वर्षे जबाबदारी पाहिली आहे. सध्या ते राज्य सहकारी साखर कारखाना संघाचे अध्यक्ष म्हणून प्रभावी काम करीत आहेत. त्यांनी यापूर्वी इस्राईल,युरोप खंड व चीन आदी १० देशांचा अभ्यास दौरा केलेला आहे.

# 'जयंत महोत्सवा'चा सुमारे २० हजार महिलांनी लुटला मनमुराद आनंद

## सौ.सुनिता देशमाने

***इस्लामपूर/प्रतिनिधी:***

वाळवा तालुक्यासह मिरज पश्चिम भाग तील डिग्रज सर्कलमधील सुमारे २० हजार महिलांनी 'जयंत महोत्सव'चा मनमुराद आनंद लुटला. ग्रामीण भागातील माता-भगिनी, युवती मोठ्या उत्साहाने महोत्सवात सहभागी झाल्या. त्या हसल्या-खेळल्या, त्यांनी आपल्या भावना मोकळेपणाने व्यक्त केल्या. या हजारो महिलांच्या चेहऱ्यावरील हास्य हे जयंत महोत्सवाचे मोठे यश असल्याचा विश्वास महिला राष्ट्रवादीच्या तालुकाध्यक्षा सुनिता देशमाने यांनी वाटेगाव येथील समारोप समारंभात व्यक्त केला. युवा नेते प्रतिकदादा पाटील, सौ.अलिका पाटील यांचे पाठबळ आणि महिला सहकारी,तसेच साहेबांच्या वर प्रेम करणाऱ्या गावोगावच्या पदाधिकाऱ्यां च्या सहकार्याने आम्ही हा महोत्सव यशस्वी पणे राबवू शकलो, असेही त्यांनी सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष, माजी मंत्री आ. जयंतराव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त वाळवा तालुका महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने १२ जि.प. मतदारसंघात 'जयंत महोत्सव' आयोजित केला होता. महिलांचे हळदी-कुंकू,तिळगुळ व वाण वाटप आणि ३ तास महिलांचे निखळ मनोरंजन असे महोत्सवाचे स्वरूप होते.

'बाईपण, भारी देवा'हे ब्रीद घेवून कामेरी येथून महोत्सवाची सुरुवात करण्यात आली. बावची, वाळवा, बागणी, डिग्रज सर्कल, बोरगाव,रेठरे हरणाक्ष, पेठ, चिकूर्डे, येलूर, कासेगाव करीत वाटेगाव येथे समारोप करण्यात आला. प्रसिध्द समालोचक मोनिका करंदीकर, नितीन गवळी यांनी छोटे-छोटे खेळ, विनोदी किस्से, उखान्यातून महिलांना दिलखुलास हसविले, खेळविले. प्रत्येक महोत्सवात ३ पैठणी, ५० आकर्षक बक्षिसे देण्यात आली.

जिल्हाध्यक्ष सुस्मिता जाधव, प्रदेश सरचिटणीस छायाताई पाटील, प्रदेश सदस्या कमल पाटील, तालुका उपाध्यक्ष वैशाली पाटील, सुजाता पाटील, सदस्या रूपाली ढोकळे, अलका माने, रेखा पवार, सरिता पाटील, स्वाती कदम, वैशाली निकम, जयश्री पवार, कल्पना कोळेकर, संगीता पाटील, मेघा पाटील, सायली गोंदील यांच्यासह शेकडो महिला कार्यकर्त्यां नी महोत्सव यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.



वाटेगाव येथील जयंत महोत्सव मध्ये बोलताना तालुकाध्यक्षा सुनिता देशमाने. समवेत माजी सभापती शुभांगी पाटील, सुवर्णा जाधव, वाटेगाव सरपंच नंदाताई चौगुले सुरुलच्या माजी सरपंच कुंदाताई पाटील,तालुका उपाध्यक्षा वैशाली पाटील व महिला पदाधिकारी.

# भाजपाच्या निवडणूक संकल्प पत्रासाठी सूचना पाठवा

## भाजपा जिल्हाध्यक्ष आ.सचिनदादा कल्याणशेट्टी यांचे आवाहन

***अक्कलकोट/प्रतिनिधी:***

लोकसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीतर्फे प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या संकल्प पत्रामध्ये ( जाहीरनामा ) कोणत्या मुद्द्यांच्या समावेश करावा तसेच विकसित भारत कसा असावा यासाठी भाजपाने नागरिकांकडून सूचना मागविल्या आहेत. १५ मार्चपर्यंत नागरिकांनी आपल्या सूचना पक्ष कार्यालयात पाठवाव्यात, असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष तथा आ.सचिन दादा कल्याणशेट्टी यांनी केले आहे. किंवा ९०९०९०२०२४ या क्रमांकावर मिस्ड कॉल दिल्यास पक्षातर्फे येणाऱ्या दूरध्वनीवर प्रत्यक्ष बोलूनही आपल्या सूचना कळविता येतील. पक्ष कार्यालयात नागरिकांच्या सूचना स्वीकारण्यासाठी सूचना



पेटीदेखील ठेवण्यात आली असल्याचेही जिल्हाध्यक्ष तथा आ.सचिन दादा कल्याणशेट्टी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

सामान्य माणसाचा विकास हेच ध्येय ठेवून सुशासनाच्या उद्दिष्टाने राजकारण करणाऱ्या भारतीय जनता पार्टीकडून आणि भाजपाच्या नेतृत्वाखालील केंद्रातील सरकारकडून काय अपेक्षा आहेत, हे कळावे तसेच यातील चांगल्या सूचनांचा संकल्पपत्रात समावेश करावा या हेतूने हे अभियान सुरु करण्यात आले आहे. नमो प, ट्वीटर सारख्या अशा विविध मार्गानेही नागरिक भाजपाला सूचना करू शकतात, असेही जिल्हाध्यक्ष तथा आ. सचिन दादा कल्याणशेट्टी यांनी या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

राज्यातील या अभियानाचा प्रारंभ भाजपा प्रदेश कार्यालयात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते नुकताच झाला. देशभरातून एक कोटी सूचना गोळा करण्याचा पक्षाचा प्रयत्न आहे. भाजपाचा निवडणूक जाहिरनामा हे विकसित भारताचे संकल्प पत्र असेल. पक्षाच्या जाहीरनाम्यात काय असावे यासाठी सामान्य माणसाचेही मत जाणून घेण्याचा हा अभिनव उपक्रम ''सब का साथ सब का विकास सब का विश्वास'' या पंतप्रधान मोदीजींच्या संकल्पनेचाच भाग आहे. मोदी सरकारच्या विकास कामांची माहिती देण्यासाठी ''विकसित भारत - मोदी की गारंटी रथ'' (व्हिडीओ व्हॅन ) सर्व लोकसभा मतदारसंघांत फिरणार असून त्याद्वारेही सामान्य नागरिकांना आपल्या सूचना भारतीय जनता पार्टीकडे कळविता येणार आहेत. या व्हिडीओव्हॅनच्या माध्यमातून २५० ठिकाणी समाजातील वेगवेगळया घटकांशी संवाद साधला जाणार आहे. या संवादातून आलेल्या सूचनांचाही समावेश संकल्प पत्रामध्ये केला जाणार आहे, असेही जिल्हाध्यक्ष तथा आ. सचिन दादा कल्याणशेट्टी यांनी या पत्रकात नमूद केले आहे.



# स गा म कॉलेजचे येथील १३ विद्यार्थ्यांची आर्मीतील अग्निवीर म्हणून निवड

***कराड/प्रतिनिधी:***

रयत शिक्षण संस्थेचे, सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड येथील एकूण १३ विद्यार्थ्यांची आर्मीतील अग्निवीर म्हणून निवडझाली आहे. यातील १९ महाराष्ट्र बटालियन एनसीसी कराडमधील विश्वजित प्रकाश पवार (अग्निवीर नेव्ही), आदित्य कृश्नांत माळी, रोहित सतीश जाधव, आकाश सुरेश जाखले (अग्निवीर आर्मी) साठी निवड झाली आहे. महाविद्यालयातील अन्य विभागातील विद्यार्थी अभय राजकुमार बागल, आदित्य अजित कोष्टी, मयुरेश अधिकराव घाडगे, सुरज शामराव पडळकर, ओंकार विकास रंधवे, प्रसाद सुनील नलवडे, प्रथमेश गणपती पवार (अग्निवीर आर्मी), अभिजित चंद्रकात कणसे (अग्निवीर तांत्रिक) म्हणून निवड झालेली आहे.

या सर्व अग्निविरांचा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन राजमाने यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयातील १३ विद्यार्थ्यांची निवड अग्निवीर म्हणून होणे ही महाविद्यालयासाठी अभिमानाची व आनंदाचे असल्याचे मत यावेळी माननीय प्राचार्यांनी व्यक्त केले. या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. एस. ए. पाटील, रसायनशास्त्र विभागप्रमुख प्रो. डॉ. यु बी. मोरे, सूक्ष्म जीवशास्त्र विभाग प्रमुख प्रा. एस.बी. पाटील. एनसीसी प्रमुख लेफ्टनंट प्रा. एस.एम. महाजन, डॉ. के.एच. पाटील, प्रा. डी. जे. जाधव प्रा. व्ही. एन. गोरे, संगणक विभाग प्रमुख प्रा. एस. आर. सावंत उपस्थित होते.

# प्रधानमंत्री मोदींचे फोटो लावून भारत ब्रँड तांदूळ विकणाऱ्या माफियांचा बंदोबस्त करा

## कामगार सेनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

***सोलापूर/प्रतिनिधी:***

सोलापूर शहरात गेल्या काही दिवसापासून लोकवस्ती झोपडपट्ट्या आणि बाजारपेठेमध्ये भारत चावल ब्रॅंड व प्रधानमंत्री मोदीजींचे फोटो लावून अनाधिकृत रित्या २९ रुपये किलो तांदूळ विकले जात आहे या तांदूळ माफीयांनी ग्राहकाकडून आधार कार्ड व इतर महत्त्वाचे कागदपत्र मागत आहेत म्हणून अशा बेकायदेशीर तांदूळ विकणाऱ्या व ग्राहकाकडून आधार कार्ड मागणाऱ्या तांदूळ तांदूळ माफीयांची चौकशी करून त्यांच्यावर कठोर कारवाई करा अशा मागणीचे निवेदन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष प्रणित महाराष्ट्र कामगार सेनेच्या वतीने विष्णू कारमपुरी (महाराज) यांच्या नेतृत्वाखाली धनराज जानकर व रेवन बुक्कानुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहे

या निवेदनात सोलापुरात भारत चावल ब्रॉंड व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे फोटो लावून आम रस्त्यावर लोकवस्तीत गर्दी असलेल्या ठिकाणी राजरोसपणे २९ रुपये किलो दराने १०किलोचे पॅकेज विकले जात आहे या तांदळाला बासमती चावल अशा प्रकारचे नाव देऊन ग्राहकांचे फसवणूक व तांदूळ काळाबाजार करीत आहेत त्याचबरोबर ग्राहकाकडून आधार कार्ड व रेशन कार्ड याच्या झेरॉक्स मागत आहेत त्यावरून ग्राहकांची डाटा उपलब्ध करून घेऊन फसवणूक करण्याची सुद्धा शक्यता नाकारता येत नाही. आणि अशाच प्रकारे गेल्या दोन महिन्यापूर्वी भारतीय जनता पक्षाच्या वतीने ५० रुपये किलो या भावाने दाळ विकलं गेलं हा देखील तोच प्रकार होता परंतु कोणाच्या लक्षात आलं नाही एकूणच पुढे येणारे काळ निवडणुकीच्या काळ आहे निवडणुकीमुळे पक्षाचा प्रचार करण्यासाठी भारतीय जनता पक्षाने आणि भाजपा केंद्र सरकारच्या माध्यमातून ही टोळी पाठविले का असे सुद्धा शक्यता नाकारता येत नाही त्याचबरोबर येणारे कुठलेही निवडणुका विशेषता लोकसभेची निवडणूक शांततेत व लोकशाही मार्गाने मोकळेपणाने व्हावे असे प्रयत्न निवडणूक आयोगाकडून होत असताना त्यास बाधा आणण्याचा प्रयत्न या कृतीद्वारे होत आहे. असाच प्रकार सोलापुरातील कर्णिक नगर या भागात ही टोळी तांदूळ विकताना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपशहर प्रमुख धनराज जानकर यांनी व नागरिकांना त्यांना अडविले ती तांदळाची गाडी जेलरोड पोलीस स्टेशन येथे नेण्यात आले



त्या ठिकाणी असंख्य भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते आले आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख प्रा. अजय दासरी विष्णु कारामपुरी (महाराज) महानगर प्रमुख, धनराज जानकर, व शिवसैनिक असे एकत्र जमून याबाबत काय प्रकार चालू आहे याची चौकशी करण्याची मागणी केली आणि यास जेलरोड पोलिसांनी चौकशी करण्याचे आश्वासन दिल्यानंतर शिवसैनिक व नागरिक निघून गेले असे या निवेदनात नमूद करण्यात आलेले आहे

विष्णू कारमपुरी (महाराज) यांच्या नेतृत्वाखाली मा. महसूल नायब तहसीलदार श्रीमती स्मिता गायकवाड यांना निवेदन देताना देणाऱ्या शिष्टमंडळात रेखाताई आडकी, लक्ष्मीबाई चिलवेरी, रेवन बुक्कानुरे ,विठ्ठल कुराडकर, धनराज जानकर, श्रीनिवास बोगा गुरुनाथ कोळी, गोवर्धन मुदगल शिवसैनिक उपस्थित होते.


# जाहीर टेंडर नोटीस ७ (२०२३-२४)

ग्रामपंचायत दिघंची, ता. आटपाडी, जि- सांगली येथील खालील कामांसाठी नोंदणीकृत मक्तेदारांकडून मोहरबंद निविदा ब-१ करारावर मागविणेत येत आहेत. तरी खालील नमूद केलेल्या कामासमोर दर्शविलेल्या तारखेच्या कालावधीमध्ये निविदा मागणी अर्ज दिले नंतर निविदा फॉर्म दिले जातील. तसेच मुदतीत आलेल्या निविदाचाच फक्त विचार केला जाईल. लिफाफा क्र. (१) तांत्रिक लिफाफा क्र. २) आर्थिक लिफाफा १५ वा वित्त आयोग योजने व जन सुविधा व ग्रामनिधी अंतर्गत.

| अ.नं. | कामाचे नांव | वर्क पोर्शन र.रू. | १८% जीएसटी | ०.५०% विमा | कामाची अंदाजपत्रकीय किंमत र.रू. | निविदा प्रकार | निविदा फॉर्म फी र.रू. | बयाना र.रू | कोऱ्या निविदा फॉर्म विक्रीची तारीख | भरलेल्या निविदा स्वीकृतीची तारीख व वेळ | कामाची मुदत | मक्तेदार प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १ | दिघंची ता. आटपाडी येथे स्मशान भूमीस सोई सुविधा पुरवणे. | ७६०७७४ | १३५४२२ | ३८०४ | ९०००० | ब-१ | ५०० | ९००० | २/०३/२४ | ९/०३/२४ सायं ५ वाजेपर्यंत | ६ महिने | खुला |
| २ | दिघंची ता. आटपाडी येथे अंगणवाडी क्र, २८ दुरूस्ती करणे | १६९२६९ | २९८८५ | ८४६ | २००००० | ब-१ | १०० | २००० | २/०३/२४ | ९/०३/२४ सायं ५ वाजेपर्यंत | ६ महिने | खुला |
| ३ | दिघंची ता. आटपाडी येथे मातंग समाजमंदिर ते बनसोडे घर आरसीसी गटर | २५३६०४ | ४५१२७ | १२६८ | २९९९९९ | ब-१ | १०० | ३००० | २/०३/२४ | ९/०३/२४ सायं ५ वाजेपर्यंत | ६ महिने | मजुर स. संस्था |
| ४ | दिघंची ता. आटपाडी येथे जमादार घर ते हुड्याचा म्हसोबा रस्ता अंतर्गत बंदिस्त गटर करणे | २५३८२७ | ४५०७१ | १२६९ | ३००१७३ | ब-१ | १०० | ३००० | २/०३/२४ | ९/०३/२४ सायं ५ वाजेपर्यंत | ६ महिने | मजुर स. संस्था |
| ५ | दिघंची ता. आटपाडी येथे जमादार घर व पिंटू जवळे ते पिंटू महाडिक बंदिस्त गटर | २५३६०४ | ४५१२७ | १२६८ | २९९९९९ | ब-१ | १०० | ३००० | २/०३/२४ | ९/०३/२४ सायं ५ वाजेपर्यंत | ६ महिने | खुला |
| ६ | दिघंची ता. आटपाडी येथे साळशिंगमळा अंगणवाडी समोर पेव्हिंग ब्लॉक बसवणे. | ८४८९५ | १४६८७ | ४२४ | १००००६ | ब-१ | १०० | १००० | २/०३/२४ | ९/०३/२४ सायं ५ वाजेपर्यंत | ६ महिने | सु.बे. |
| ७ | दिघंची ता. आटपाडी येथे वडर समाज मंदिर दुरूस्ती | ६६६९४ | १२००५ | ३३३ | ७९०३२ | ब-१ | १०० | ८०० | २/०३/२४ | ९/०३/२४ सायं ५ वाजेपर्यंत | ६ महिने | मजुर स. संस्था |
| ८ | दिघंची ता. आटपाडी येथे होलार समाजमंदिर दुरूस्ती | ८५०४५ | १४५२७ | ४२५ | १००००० | ब-१ | १०० | १००० | २/०३/२४ | ९/०३/२४ सायं ५ वाजेपर्यंत | ६ महिने | मजुर स. संस्था |
| ९ | दिघंची ता. आटपाडी येथे मातंग समाज मंदिर दुरूस्ती | ६९९५७ | १२४१२ | ३४५ | ८१७१४ | ब-१ | १०० | ८१७ | २/०३/२४ | ९/०३/२४ सायं ५ वाजेपर्यंत | ६ महिने | मजुर स. संस्था |

अटी व शर्ती १) सदर निविदा स्वीकारणे अगर नाकारणेचा हक्क खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे. २) सविस्तर निविदा सुचना ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील. ३) पूर्ण भरलेला मोहरबंद निविदा फॉर्म सोबत - लिफाफा क्र (१) मध्ये १) निवेदा फी आणि बयाना रक्कम भरलेली पावती २) पॅन कार्ड ३) ZP/MGP व्यवसाय नोदणी प्रमाणपत्र /बांधकाम नोदणी प्रमाणपत्र ४) जीएसटी नोदणी प्रमाणपत्र ५) इन्कम टक्स रिटर्न ६) निविदेतील अटी शर्ती मान्य असलेचे हमी पत्र सोबत जोडावे ८) सदरचे काम उपअभियंता सो.पं. स. आटपाडी यांचे मार्गदर्शनव सूचनेप्रमाणे व दिलेल्या मुदतीत पूर्ण करणेचे आहे. ९) सदर कामाचे बिल मुल्याकन प्राप्त झालेनंतर अदा केले जाईल. १०) कामाच्या बिलातून शासकीय नियमाप्रमाणे आवश्यक त्या सर्व कपातीच्या रक्कमा कपात करूनच बिल अदा केले. जाईल. ११) सुरु असलेल्या कामाचे दाखले सोबत जोडावीत १२) यापूर्वी केलेली कामे (कामाचा अनुभव) काम पूर्णत्वाचे दाखले जोडावेत. लिफाफा क्रमांक (२) सोबत (अ) टेंडर फॉर्म सही सह (ब) परफॉर्मन्स सुरक्षा अनामत रक्कम डी.डी. अथवा बँक गरंटी

ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत दिघंची
ता. आटपाडी जि. सांगली

सौ. एम. ए. मोरे
सरपंच
ग्रामपंचायत दिघंची
ता. आटपाडी जि. सांगली